"लक्ष्मी मुक्ती"-मालमत्तेमध्येमहिलांचा हिस्सा

७/१२उता-यात पुरुषाबरोबर स्त्रियांच्या मालकीहक्काची नोंद होणे बाबत-----

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
परिपत्रक क्र. एस-१४/२१६८१६२प्र.क्र. ४५८/ल ६,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक -

परिपत्रक:-

स्त्रियांचे हक्क सुरक्षित रहावे यादृष्टीने काही सामाजीक संघटनांना सूचविल्याप्रमाणे शासन सर्व संबंधितांना असे आदेश देत आहे कीं, एखाद्या व्यक्तीने आपल्या स्वत:च्या जमिनीत आपल्या कायदेशीर पत्नीच्या नावाचा ७/१२ च्या उता-यात स्वत:बरोबर सहहिस्सेदार म्हणून नोंद घ्यावी, अशी स्वेच्छेने विनंती केल्यास, महाराष्ट्र महसूल अधिनियम, ६७ १९६६ मधील कलमांच्या अधीन राहून फेरफार नोंदीबाबतची सर्व प्रक्रिया पूर्ण करुन तशी नोंद घेण्यास हरकत नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

स्वाक्षरी[व.ल.गवई ]
उप सचिव,
महसूल व वन विभाग.

क्रमांक. अ.का. ३/भूसुधार/३६२०/९२
आयुक्तांचे कार्यालय, अमरावती
विभाग, अमरावती. दि २५.९.९२

उप विभागीय अधिकारी, ----------
तहसिलदार ~~अमरावती~~
=सर्वच= यांना माहीती करीता रवाना.

आयुक्त,
अमरावती विभाग, अमरावती
करीता.

# अर्ज

प्रति

तलाठी..............

विषय – ७/१२ उताऱ्यावर पुरूषाच्या नावासोबत पत्नीचे नाव सहहिस्सेदार म्हणून लावणे बाबत.

अर्जदार – ......................................

महोदय,

वरिल विषयानुसार अर्ज सादर करण्यात येतो की, मी............................ येथील रहीवासी असून माझे शेत मौजा .....................या गावमध्ये असून माझ्या शेताचा शेंत स.न.......................हा असून माझे शेताचे ७/१२ उता–यावर माझ्या नावांसोबत माझ्या पत्नीचे नाव सहहिस्सेदार म्हणून लावण्यात यावे त्याकरिता आवश्यक असलेले कागदपत्रे मी यासोबत आपणांकडे सादर करण्यात येत आहे.

आवश्यक कागदपत्रे–

१.रहीवासी दाखला

२.रेशनकार्ड

३.मतदान कार्ड./आधारकार्ड

४.शेताचा ७/१२सह अर्ज

५पोलीस पाटील यांचा कायदेशिर पत्नीं असल्याचा दाखला.

६.पतीचे संमतीपत्र.

स्थळ –

दिनांक–

सही

Scanned by CamScanner

# प्रतिज्ञापत्र

प्रति

वि.कार्यकारी दंडाधिकारी साहेब,
पुसद.

प्रतिज्ञक. — ..........................................

विषय — श्रीमती....................नावाची व्यक्ती माझी पत्नी असले बाबत व हे नाव ७/१२ वर नोंदविण्याबाबत.

महोदय,

मी वरिलप्रतिज्ञक सत्य प्रतिज्ञेवर खरे सांगतो की, श्रीमती.............................. रा........... हया नावाची व्यक्ती माझी पत्नी असून राशन कार्ड वरील तिचे नाव................. आहे व माझे शेतीचे ७/१२ वर संबंधित महिलेचे नाव सहहिस्सेदार म्हणून नोंद करण्याकरिता श्रीमती .................................नावाची व्यक्ती माझी पत्नी असलेबाबत प्रतिज्ञापत्र सादर करण्यात येत आहे.तसेच हे नाव नोंदविण्यास माझी कोणतीही हरकत नाही.

स्थळ —

दिनांक—

सही

Scanned by CamScanner